## प्रकरण आठवे

# प्रशासकीय सुधारणा
# (Administrative Reforms)

आधुनिक काळात जगातील सर्वच राष्ट्रांना आपले प्रशासन कार्यक्षम व लोकाभिमूख असावे असे वाटू लागले आहे. प्रशासन हे राज्यातील जनतेच्या सोयीसाठी असते. जनतेला विविध प्रकारच्या सोयी, सेवा पुरविणे हा प्रशासनाचा प्रमुख उद्देश असतो. म्हणून प्रशासन व जनता यांच्यात जवळचे संबंध प्रस्थापित झाले पाहिजेत. प्रशासनानेही जनतेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याकरिता प्रशासन लोकाभिमूख करण्यावर भर दिला जातो. त्याचबरोबर प्रशासनाकडून राज्यातील जनतेच्या असलेल्या अपेक्षांची पूर्तता होण्यासाठी प्रशासनात कार्यक्षमता निर्माण करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

प्रशासकीय सुधारणांच्या प्रयत्नांना दुसऱ्या महायुध्दानंतर विशेष गती मिळाली. कारण या काळात प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ झाली. त्यासाठी विविध देशांनी त्या दृष्टीने निश्चित व पध्दतशीर आणि संघटीत प्रयत्न सुरू केले. याचा परिणाम प्रशासनात विविध प्रकारच्या सुधारणा घडून येत आहेत.

साधारणत: प्रशासकीय सुधारणांचे तात्पर्य सरकारी विभागाच्या ढाच्यातील फेर बदलासंबंधी मानले जाते. परंतु हे कार्य व्यापक व गंभीर स्वरूपाचे आहे. प्रशासकीय सुधारणांचासंबंध खालील बाबींशी येतो. प्रशासकीय संरचनेत बदल, प्रशासकीय प्रक्रियेत बदल, प्रशासकीय कायदे व नियमात बदल, प्रशासकीय व्यवहारात सुधारणा, संघटनेचे उद्देश व लक्ष्य यात बदल आणि कार्यक्षमता, विश्वसनियता यात वाढ करण्यासाठी नवीन प्रयोग आदी.

प्रशासकीय सुधारणा सरकारी व खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या संघटनेत केल्या जातात. या प्रशासकीय सुधारणाचा मुख्य उद्देश शासकीय व्यवस्थेत संघटनात्मक, संरचनात्मक, कार्यात्मक, प्रक्रियात्मक, व्यावहारिक आणि कायदेशीर सुधारणाशी आहे.



Scanned with OKEN Scanner

## [illegible]कीय सुधारणांचा उद्देश (Objectives of Administrative Reforms) :-

प्रशासकीय सुधारणाचा मूळ हेतू कोणत्याही प्रशासकीय संघटनांचे कार्ये, कार्यपध्दती, ढाचा यात बदल करणे हा असतो. ज्यामुळे प्रशासन कार्यक्षम व व्यावहारिक बनविता येते. साधारणतः प्रशासकीय सुधारणांचा उद्देश पुढीलप्रमाणे असतो.

१. प्रशासकीय कार्य आणि कार्यपध्दतीत प्रसंगानुसार परिवर्तन करणे.

२. प्रशासकीय व्यवस्था जड होण्यापासून त्याचा बचाव करण्याचा प्रयत्न करणे.

३. बदलत्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, तांत्रिक आणि राजकीय परिस्थितीनुसार प्रशासन कौशल्य निर्माण करणे.

४. सर्वसामान्य लोकांच्या समस्या, जनतेच्या आकांक्षा आणि भावनांची कर्मचाऱ्यांना माहिती देणे.

५. प्रशासकीय कार्यक्षमता व कार्यनिष्पन्नतेचे उच्चस्थान प्राप्त करणे.

६. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक संदर्भात प्रशासनाची व्यावहारिकता कायम ठेवणे.

७. सरकारची धोरणे, योजना, व्युहरचना आणि नवीन कार्यक्रमास अनुसरून प्रशासन संचालित करणे.

८. प्रशासनातील अकार्यक्षमता, शिथिलता, निष्क्रीयता आणि भ्रष्टाचार यावर अंकुश ठेवणे.

९. नियंत्रण, पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्वास निश्चित करणे.

१०. सार्वजनिक पैशाचा सदुपयोग निश्चित करणे.

११. जनतेचे प्रश्न आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारी कमी करण्याचा प्रयत्न करणे.

प्रशासकीय सुधारणांचा उद्देश बहुआयामी असतो कारण प्रशासनातील समस्या हया केवळ सामान्य जनतेच्या हितावरच आघात करतात असे नाही तर सनदी सेवकही या समस्येने पिडीत असतात.

## ब. गोरवाला आयोग १९५१ (Gorwala Commission 1951) :-

१९५० मध्ये नियोजन आयोगाच्या स्थापनेनंतर नियोजनबध्द विकासाच्या बाबतीत तत्कालीन प्रशासन आणि प्रशासकीय पध्दतीची उपयुक्तता तपासण्याची



आवश्यकता वाटू लागली. म्हणून सन १९५१ साली ए. डी. गोरवाला आयोग स्थापन करण्यात आला. गोरवाला हे सेवानिवृत्त सनदी अधिकारी होते. त्यांनी भारतीय प्रशासनाचा अभ्यासकरून ३० एप्रिल रोजी 'लोकप्रशासनावरील अहवाल' सादर केला. त्यांनी आपल्या अहवालात प्रशिक्षण, संघटना आणि पध्दती, संचालक कार्यालयाची नियुक्ती करण्याची शिफारस केली होती.

ए. डी. गोरवाला यांचा ७० पानाचा हा अहवाल नऊ प्रकरणात विभागण्यात आला. पहिल्या प्रकरणात गोरवाला म्हणतात की, निकृष्ट सरकार आणि उत्कृष्ट प्रशासन जास्तीत जास्त एक अस्थिर संयोग असतो. सरकारची सुदृढता व कमकुवतपणा हा तेथील जनता व त्यांच्या नेत्यांचे चारित्र आणि वर्तमान राजकीय व्यवस्थेवर अवलंबून असते. कोणतीही लोकशाही व्यवस्था एक स्पष्ट, कुशल आणि निष्पक्ष प्रशासनाच्या अभावी यशस्वी नियोजन करू शकत नाही. दुसऱ्या प्रकरणात समस्या, स्वरूप व दृष्टीकोन यावर चर्चा केलेली आहे. यात अधिक सत्यनिष्ठा, अधिक कार्यकुशलता व जनतेच्या आवश्यकतेप्रती अधिक उतरदायित्व यावरील समस्यांचा विचार केलेला आहे. समस्यांचे सर्वोत्तम उपायांच्या रूपात पाच तत्त्वे सांगितलेली आहेत. ती अशी १. धोरणे आणि कर्मचारी यांना प्राथमिकता २. प्रत्यक्ष सत्यनिष्ठा ३. परस्पर समजदारी ४. गतीशिलता, प्रभावीपणा आणि जबाबदारी ५. अल्पकाळ व दीर्घकाळ योग्य प्रशिक्षण आणि योग्य भरतीसंबंधी योजना. तिसऱ्या प्रकरणात प्राथमिकता, चौथ्यात सत्यनिष्ठा व इमानदारी, पाचव्यात समजदारी, सहाव्यात सुधारणा आणि पुनर्रचना, सातव्यात प्रशिक्षण, आठव्यात भरती आणि नवव्यात प्रशासन, नियोजन आणि जनतेशी संबंधीत चर्चा केली आहे.

गोरवाला यांनी भारतातील विद्यमान लोकप्रशासन व्यवस्था आणि नोकरशाही साच्यास कोणताही धोका पोहचू न देता विद्यमान साच्यातील वाईट बाबी दूर करण्याचे व प्रशासन अधिक सक्षम करण्याचे उपाय सांगितलेले आहेत. ते उपाय खालीलप्रमाणे आहेत.

### १. सर्वात महत्त्वाच्या बाबीस प्राधान्य (Placing first things first) :-

गोरवाला यांच्या मतानुसार, ज्या बाबी सर्वात महत्त्वाच्या आहेत त्यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. दुय्यम महत्त्वाच्या बाबी बाजूला सारल्या पाहिजेत. काही निर्धारित लक्ष्य गाठण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कारण भारतीय प्रशासनात चांगल्या साधनांचा व उपकरणांचा अभाव आहे.



Scanned with OKEN Scanner

## २. परिणामांचे मूल्यांकन (Assessment of Results) :-

शासन विविध बाबींवर जास्तीत जास्त खर्च करते कारण यातून काही तरी निश्चित परिणाम प्राप्त होईल असे वाटत असते. मात्र असे होत नाही. जेव्हा जास्तीत जास्त खर्चास मंजूरी असते तेव्हा परिक्षण आणि मूल्यांकनाची एखादी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. म्हणजे ज्यावर खर्च होतो त्याचे मूल्यमापन केले जावे.

## ३. ईमानदारी व सत्यनिष्ठा (Integrity) :-

धोरण लागू करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये ईमानदारी व सत्यनिष्ठा असावी. त्यांच्यात आज्ञेचे पालन व नैतिक चारित्र्याचा विकास झालेला असावा. गोरवाला आपल्या अहवालात मंत्री, आमदार आणि प्रशासक यांच्या गैरमार्गाचे मुख्यत: तीन भागात विभाजन करतात. (१) भ्रष्टाचार (२) संरक्षण - जो जातीयवाद, पक्षपात, सांप्रदायिकवाद यावर आधारीत असतो (३) प्रभाव-गैरमार्गाचे स्वरूप कोणतेही असो त्यामुळे शासनाचे धोरण वाईट होते त्याचा परिणाम प्रशासन कमकुवत होऊन जनतेच्या विकास कामात अडथळा येतो.

## ४. मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यातील संबंध

## (Relationship between ministers and senior officers):-

गोरवाला यांच्या अहवालानुसार मंत्र्यांनी विभागातील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला पाहिजे. मंत्री व त्यांच्या विभागातील सनदी सेवक यांच्यातील चांगल्या संबंधावरच कार्यक्षम प्रशासन अवलंबून असते. यामुळे सरकार लोकप्रिय बनते आणि प्रशासनात कार्यक्षमता येते.

## ५. गैर मार्गाने जाणाऱ्यांना विरोध करून त्यावर उपाय करणे

## (The Remedy for Deviation) :-

मंत्री, आमदार आणि प्रशासक यांच्यातील आढळून येणाऱ्या गैरमार्गावर टीका करताना गोरवालांनी पुढील उपाय सुचविले आहेत. ते म्हणजे आमदाराचे चारित्र्य सुधारणे, मंत्र्यांनी उत्तरदायित्वाची भावना ठेवणे आणि प्रशासकांनी स्वभावात बदल करणे गरजेचे आहे. राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळात उमेदवारांची निवड करतांना दक्षता घेतली पाहिजे, कारण हेच उमेदवार आमदार वा मंत्री



होतात. उमेदवार म्हणून अशाच व्यक्तीची निवड करावी, की जो चारित्र्यवान आहे, समस्यांचे निराकरण निष्पक्षपातीपणे करण्याची क्षमता आहे आणि गुणांच्या आधारावर सत्य निर्णय घेण्याची क्षमता आहे.

## ६. नियोजनाची अपेक्षा (Requirements of planning) :-

गोरवाला अहवालानुसार नियोजनासाठी अशा तत्त्वांची आवश्यकता आहे जी साधारण प्रशासनासाठी आवश्यक तत्त्वे मानली जातात. ती म्हणजे प्रशासनात योग्य प्रकारे कर्मचाऱ्यांची भरती करावी, योग्य प्रशिक्षणाची व्यवस्था असावी, योग्य संघटन असावे.

गोरवाला यांनी आपल्या अहवालात उल्लेख केलेल्या अन्य शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. धोरण निर्मिती व अंमलबजावणीत स्पष्ट अंतर असावे.

२. कर्मचाऱ्यांची निवड करीत असताना ती मानसशास्त्रीय परिक्षणातून करावी.

३. आर्थिक असैनिक सेवाची स्थापना करावी.

४. अखिल भारतीय सेवेतील कर्मचाऱ्यांची आपल्या राज्यातून इतर राज्यात नियुक्ती करावी.

५. मंत्र्यांना उच्च सनदी अधिकाऱ्यांनी सल्ला द्यावा.

६. लोकसेवा आयोगामार्फत आयोजित स्पर्धा परीक्षेत सामान्य प्रश्नास अधिक गुण ठेवावेत.

७. भारतीय प्रशासकीय सेवा महाविद्यालयाच्या संघटनेत सुधारणा करून पूर्णवेळ प्राचार्य नियुक्त करावा.

८. व्हीटले परिषदेची स्थापना करावी.

९. योग्य वेतन आणि योग्य शिक्षेच्या माध्यमातून प्रशासनात शिस्तीची स्थापना करावी.

१०. वरिष्ठ अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त निरिक्षण व निर्देशन आणि कनिष्ठ अधिकाऱ्यांना अधिक उत्तरदायित्वाचे कार्य द्यावे.

११. मंत्रिमंडळाच्या कार्यपध्दतीत सुधारणा करावी.

१२. नियोजनात उत्तरदायित्व व विकेंद्रीकृत व्यवस्था स्थापित करावी.

१३. प्रशासकीय मंत्रालयास वित्त मंत्रालयाच्या नियंत्रणातून मुक्त करून



Scanned with OKEN Scanner

अधिक स्वातंत्र्य प्रदान करावे.

१४. सचिवालयाद्वारे विभागप्रमुखांच्या कार्यात हस्तक्षेप केला जाऊ नये.

१५. संसदीय नियंत्रणासाठी लोकलेखा आणि अंदाज समितीच्या माध्यमातून योग्य वापर करणे.

डॉ. पी. डी. शर्मा यांच्या शब्दात, श्री गोरवाला यांनी 'केंद्र व राज्य दोन्ही स्तरावर मूलभूत प्रशासकीय सुधारणासाठी योजनाबध्द सूचना केल्या आहेत; परंतु भारत सरकारने या सूचना अंमलात आणण्यास अधिक रूची दाखविली नाही.'

## क) पॉल एच. ॲपलबी आयोग १९५३ :-

१९५२ साली पंडित जवाहरलाल नेहरू सरकारने भारतातील प्रशासकीय सुधारणांचा अभ्यास करण्यासाठी लोकप्रशासनाचे गाढे अभ्यासक पॉल एच. ॲपलबी यांची नियुक्ती केली. पॉल एच. ॲपलबी यांनी भारतीय लोकप्रशासनाचा सैध्दांतिक व व्यावहारिक दृष्टीकोनातून सखोल अभ्यास केला. १९५३ साली आपला भारतातील लोकप्रशासन सर्वेक्षण अहवाल केंद्र सरकारला सादर केला. ३००० शब्दांच्या आपल्या अहवालात पॉल एच. ॲपलबी यांनी असे नमूद केले, की जगातील ज्या बारा देशातील लोकप्रशासन संघटीत आणि विकसीत आहे त्या बारा देशांपैकी भारत हा एक आहे. ॲपलबीच्या शिफारशींचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

१. ॲपलबीने आपल्या अहवालाच्या सुरूवातीलाच भारताची एकता आणि विविधता यासंबंधी प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या मते भारतातील परिस्थिती विचारात घेतल्यास भारतीय संघराज्यातील घटक राज्यांना अधिक स्वायतत्ता देणे योग्य ठरणार नाही.

२. भारतातील सेवासंबंधी मत व्यक्त करताना ॲपलबी म्हणतात, देशातील सर्व सनदीसेवा एकत्रित करून एक सामान्यसेवा निर्माण केली पाहिजे.

३. सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाकालात प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय लोकप्रशासन संस्थेची स्थापना केली पाहिजे. नवी दिल्लीतील भारतीय लोकप्रशासन संस्था ॲपलबीच्या शिफारशीचाच परिणाम आहे.

४. संघटना आणि पध्दतीची (O and M) स्थापना करावी.

५. नियोजन आयोगाचे कार्य केवळ योजना तयार करण्यापुरते मर्यादित असावे. योजना कार्यान्वीत करण्याची जबाबदारी योजना आयोगाची नसावी.

६. भारतीय सार्वजनिक प्रमंडळाच्या बाबतीत ॲपलबी यांची अशी सूचना



होती, की सार्वजनिक प्रमंडळाचे स्वरूप सरकारी असावयास पाहिजे व त्यांना अधिक स्वायतत्ता देणे योग्य ठरणार नाही.

७. सरकारच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सर्व घटक राज्यात कृषि उत्पन्न कर लागू करावयास पाहिजेत.

८.भारतीय प्रशासनात पंक्तीघटक व स्टाफ घटक यांच्यात स्पष्ट फरक नसल्यामुळे प्रशासनात गोंधळ निर्माण होत आहे, की जे दूर करणे आवश्यक आहे.

९. आर्थिक कार्यांच्यासंबंधी अन्य मंत्रालयांना वित्त मंत्रालयातून मूक्त करावे.

१०. केंद्र सरकारच्या वेगवेगळया मंत्रालयात समन्वय स्थापन करावा.

११. सामुदायिक विकास कार्यक्रमात उत्तरदायित्व निश्चित करावे.

१९५३ नंतर पॉल एच. ॲपलबी पून्हा दोन वेळा भारतात आले आणि १९५६ मध्ये त्यांनी आपला ५९ पानांचा दुसरा अहवाल जो "भारतीय प्रशासनाचे पुनर्परिक्षण राज्य औद्योगिक व व्यापारी उपक्रमांच्या विशेष संदर्भात" केंद्र सरकारला सादर केला. यावेळेस ॲपलबीने सार्वजनिक प्रमंडळाच्या समस्यांचा अतिशय बारकाईने अभ्यास केला. ॲपलबीच्या दुसऱ्या अहवालातील प्रमुख सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१. ॲपलबीने आपल्या दुसऱ्या अहवालात सार्वजनिक प्रमंडळास अधिक स्वायतत्ता देण्यावर भर दिला असून धोरण निर्मितीत अधिक स्वायतत्ता देण्याची सूचना केली आहे.

२. सत्तेच्या प्रत्यायोजनावर आणि हस्तांतरणावर अधिक भर दिला.

३. ॲपलबीने नियंत्रक व महालेखापरीक्षकास अधिक महत्त्व देण्याच्या प्रकारावर टीका केली. त्यांच्या मते प्रशासकीय कार्यात नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा हस्तक्षेप कमी केला पाहिजे. नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा अहवाल मर्यादित आणि निवडक स्वरूपाचा असावा.

४. योजना निर्मिती आणि योजना आयोगाच्या महत्त्वाचे समर्थन केले. योजना आयोगाने फक्त योजना तयार केली पाहिजे, प्रशासकीय कार्यात हस्तक्षेप करू नये.

५. ॲपलबीने प्रत्येक मंत्रालयात कार्य व्यवस्थापन कार्यालय स्थापन करण्याची शिफारस केली. त्यांच्या मते, या कार्यालयाने प्रशासकीय नियंत्रणासाठी लेखांकन ठेवण्याचे कार्य करावे आणि संसदेद्वारे स्विकृत पैशाच्या अधिन आपला खर्च ठेवावा.



Scanned with OKEN Scanner

६. संसदेस धोरण लागू करण्याचे अधिकार नसावेत. तसेच संसद सदस्यांचा प्रशासकीय कार्यात हस्तक्षेप नसावा. संसदेचे सदस्य सनदी सेवकांच्या कार्यात हस्तक्षेप करण्यासाठी मंत्र्यांना प्रवृत्त करतात की जे अयोग्य आहे.

७. मंत्रालयाच्या आर्थिक व अर्थसंकल्पीय पध्दतीच्या संदर्भात संघटनात्मक सुधारणा करावयास पाहिजेत. वित्त अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली लेखांकनाचे कार्य व्यवस्थित स्वरूपात केले पाहिजे.

८. सनदी सेवकात नेतृत्व व कल्पनाशक्तीचा विकास झाला पाहिजे. यामुळे कार्यक्षमता वाढेल. अधिकाऱ्यांना स्वविवेकानुसार कार्य करण्याची संधी देण्यासाठी त्यांना व्यापक स्वरूपाचे अधिकार द्यावेत.

९. वेगवेगळया विभागात समन्वय स्थापन करून नियोजन कार्यात गती वाढविण्यासाठी एका उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली पाहिजे.

## ड) प्रशासकीय सुधारणा आयोग १९६६-१९७० (Administrative Reforms Commission 1966-1970) :-

भारताच्या प्रशासकीय व्यवस्थेची सर्वांगीण चिकित्सा करण्याचा प्रयत्न प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या रूपात १९६६ साली करण्यात आला. या आयोगाची स्थापना ५ जानेवारी १९६६ रोजी मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. आयोगात के. हनुमंतय्या, हरिश्चंद्र माथूर, जी. एस. पाठक आणि एच. व्ही. कामथ हे सदस्य तर व्ही. शंकर यांना सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले. व्ही. शंकर वगळता अन्य सर्व सदस्य संसदसदस्य होते. आयोगाला अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागले. १९६७ साली मोरारजी देसाई यांची उपपंतप्रधानपदी नियुक्ती झाली. त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. के. हनुमंतय्या प्रशासकीय सुधारणा आयोगाचे नवे अध्यक्ष झाले. पुढील वर्षी जी. एस. पाठक यांची राज्यपालपदी नेमणूक झाली. त्यामुळे त्यांनीही आपले पद सोडले. तिसऱ्या वर्षी माथूर यांचे निधन झाले. पाठक व माथूर यांच्या रिक्त जागेवर डी. मुखर्जी व टी. एन. सिंह यांची नियुक्ती करण्यात आली. आयोगास पुढील बाबींवर विशेषत्वाने विचार करण्याचे आदेश देण्यात आले होते. भारत सरकारची यंत्रणा व कार्यपध्दती, सर्व पातळयावरील नियोजनासाठी यंत्रणा, केंद्र-राज्य संबंध, वित्तीय प्रशासन, सेवक प्रशासन, आर्थिक प्रशासन, राज्यपातळीवरील प्रशासन, जिल्हा प्रशासन, कृषि प्रशासन, नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करण्याविषयीच्या समस्या आदी.



प्रशासकीय सुधारणा आयोगाने ही जबाबदारी पार पाडण्यासाठी २० अभ्यासगट व १३ कार्य गटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटात वेगवेगळ्या क्षेत्रातील २९० तज्ज्ञ लोकांनी कार्ये केली. यासाठी जवळपास ६६ लाख रूपये खर्च झाले. आयोगाने आपला पहिला अहवाल २० ऑक्टोंबर १९६८ रोजी तर अंतिम अहवाल ३० जून १९७० रोजी सादर केला. आयोगाने एकूण ५७८ सूचना केल्या. त्यापैकी ५१ राज्यसरकारांशी संबंधीत, ५१९ केंद्र सरकारशी संबंधीत आणि ८ केंद्र व राज्य सरकारशी संबंधीत होत्या. जवळपास ८०% शिफारशींचा सरकारने स्वीकार केला. त्यातील काही प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. मंत्रिपरिषदेतील मंत्र्यांची संख्या ४५ पेक्षा अधिक नसावी. पंतप्रधानासह कॅबिनेट मंत्र्यांची संख्या जास्तीत जास्त १६ असावी. मंत्रिपरिषदेच्या रचनेची त्रि-स्तरीय पध्दत चालूच ठेवावी. सांसदीय सचिवाचे पद रद्द करावे.

२. शासन यंत्रणेचे कामकाज कार्यक्षमतेने व प्रभावीपणे चालविण्यासाठी उपपंतप्रधानपद निर्माण करावे. सर्व महत्त्वाच्या नेमणूका पंतप्रधानाच्या मताने कराव्यात. पंतप्रधानाकडे खात्याचा कार्यभार नसावा. त्यांचा वेळ प्रामुख्याने मार्गदर्शन, समन्वय आणि देखरेख यासाठी उपलब्ध असावा.

३. मंत्र्याची नेमणूक करताना पंतप्रधानांनी गुणवत्तेच्या निकषाचा विचार करावा व त्यानुसारच मंत्री निवडावेत.

४. मंत्र्यांनी सचिवावर विश्वास ठेवावयास पाहिजे. महत्त्वाच्या विषयासंबंधी विचार करीत असताना सचिवांच्या सूचनांना महत्त्व दिले पाहिजे.

५. मंत्र्यांनी आपल्या विभागाच्या दैनंदिन प्रशासनात हस्तक्षेप करू नये.

६. जी कार्ये सनदी सेवकांनी मंत्र्यांच्या आदेशा विना केली आहेत. त्यासाठी मंत्र्यास जबाबदार धरू नये.

७. प्रत्येक महिन्यातून किमान एक वेळ तरी पंतप्रधानांची मंत्र्यांशी मुलाखत झाली पाहिजे. पंतप्रधानांनी त्या मंत्र्यांच्या विभागाच्या कार्याची चिकित्सा केली पाहिजे.

८. सर्व प्रकारच्या धोरणासाठी संबंधीत विभागाच्या मंत्र्यास जबाबदार धरले पाहिजे.

९. तांत्रिक स्वरूपाच्या विभागाची कार्ये पार पाडण्यासाठी विशेषज्ञ कर्मचाऱ्यांची मदत घेतली पाहिजे.

१०. ज्या विभागांची कार्ये अधिक विस्तृत व व्यापक आहेत अशा विभागासाठी वेगळा नियोजन विभाग स्थापन केला जावा.



Scanned with OKEN Scanner

११. पंतप्रधानाच्या नियंत्रणाखाली सेवावर्ग विभाग असावा, त्यांचे प्रमुख कार्ये वेगवेगळ्या मंत्रालयात आणि विभागात योग्य समन्वय प्रस्थापित करण्याचे असेल.

१२. वैज्ञानिक आणि तांत्रिकी विषयावर सल्ला देण्यासाठी एक सचिवालय असावयास पाहिजे.

१३. गृहमंत्रालयाच्या न्यायिक कार्यास कायदामंत्रालयाच्या अंतर्गत समाविष्ट करावयास पाहिजे आणि या नव्या विभागाचे नाव विधी आणि न्याय मंत्रालय असावयास पाहिजे.

१४. प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशी कुठपर्यंत लागू करण्यात आल्या आहेत हे पाहण्यासाठी एक सर्वपक्षीय समिती स्थापन केली पाहिजे.

१५. प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची जबाबदारी उपपंतप्रधानाची असली पाहिजे.

१६. वर्तमान योजना आयोगास काही दुरूस्त्यासह कार्यरत राहू द्यावे.

१७. पंतप्रधानाचा योजना आयोगाशी घनिष्ठ संबंध असावा. योजना आयोगाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान पंतप्रधानांनी स्वीकारले पाहिजे.

१८. मंत्र्यांना योजना आयोगाचा सदस्य बनवू नये.

१९. योजना आयोगाने एका सल्लादायी संस्थेच्या रूपात कार्य केले पाहिजे.

२०. योजना आयोगाच्या सदस्यांची जास्तीत जास्त संख्या सात असावी.

२१. योजना आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असावा.

२२. राज्यात योग्य व अनुभवी व्यक्तीचीच राज्यपालपदी नियुक्ती केली जावी.

२३. राज्यपालाच्या नियुक्तीपूर्वी संबंधीत राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा सल्ला घ्यावा.

२४. मंत्रिपरिषदेस विधानसभेत बहुमत आहे किंवा नाही याचा निर्णय विधानसभेतच करावयास पाहिजे. मुख्यमंत्री विधानसभेचे अधिवेशन बोलावत नसेल तर राज्यपाल विधानसभेचे अधिवेशन बोलावू शकतो.

२५. केंद्राची कार्ये आणि अधिकार मर्यादित करावेत.

२६. उत्पादक स्वरूपाच्या योजनासाठीच राज्यांना पैसा दिला जावा. केंद्राकडून घेतलेला पैसा राज्यांनी वेळेवर व्याजासह परत करावयास पाहिजे.

२७. राज्या-राज्यांतील परस्पर वादांचा नायनाट करण्यासाठी संविधानातील



कलम २७३ नुसार एक आंतरराज्यीय परिषद स्थापन करावी.

२८. प्रशासकीय सुधारणांच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कर्मचारी विभागावर असेल.

२९. I.A.S. भरतीची वयोमर्यादा २८ वर्ष असावी आणि फक्त दोनच संधी देण्यात याव्यात.

३०. तृतीय व चतूर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांची भरती एकाच अभिकरणाकडून केली जावी. तसेच तांत्रिकी स्वरूपाच्या पदाची भरती करण्यासाठी एक मंडळ स्थापन करण्यात यावे.

३१. I.A.S. अधिकारी व वर्ग १ चे अधिकारी स्पर्धा परीक्षेद्वारेच निवडले जावेत.

३२. राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षाची आणि सदस्यांची निवड राज्यपालाच्या सल्ल्यानुसार करावी. राज्य लोकसेवा आयोगातील सदस्यांपैकी एक सदस्य राज्याच्या बाहेरचा असावा. संघ लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष राज्याच्या लोकसेवा आयोगातून घेतला जावा.

३३. कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर सर्वाधिक लक्ष केंद्रीत करावे.

३४. प्रत्येक कर्मचाऱ्यांकडून सेवेत रूजू करून घेताना संपावर न जाण्याचे शपथपत्र घ्यावे.

३५. कोणत्याही कर्मचाऱ्यास तीन महिन्यापेक्षा अधिक काळासाठी निलंबीत करू नये. केवळ न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत निलंबनाचा कालावधी अधिक असू शकतो.

या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशीनुसार योजना आयोगात विशेषज्ञांची नियुक्ती, केंद्रीय मंत्रालयात आर्थिक सल्लागार, राज्यात नियोजन मंडळाची स्थापना, लोकायुक्ताची स्थापना, निष्पादन अर्थसंकल्पाची सुरुवात, स्वतंत्र प्रशासकीय सुधारणा विभाग घटीत करण्यात आला आहे.

## इ) न्या. सरकारिया आयोग १९८३-१९८७

**(Justice Sarkaria Commission 1983-1987) :-**

केंद्र-राज्य संबंधातील वादग्रस्त मुद्यांचे सखोल अध्ययन करण्यासाठी आणि त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाय सूचविण्याकरिता सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आर. एस. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली



Scanned with OKEN Scanner

एक आयोग स्थापन करण्याची घोषणा तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी २४ मार्च १९८३ रोजी केली. तसेच श्री. बी. शिवरामन आणि डॉ. एस. आर. रो यांची या आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. केंद्र-राज्य यांचे अधिकार, कार्ये आणि उत्तरदायित्व यांचे अध्ययन आणि त्यात योग्य त्या सुधारणा करण्यासाठी आयोगाने १०९ प्रश्नांची विस्तृत प्रश्नावली तयार केली. ज्यात केंद्र-राज्य कायदेविषयक संबंध, राज्यपालाचे अधिकार, योग्यता आणि भूमिका, वित्तीय संबंध, सामाजिक-आर्थिक विषयावर प्रश्न तयार करण्यात आले होते. प्रश्नावलीच्या ६८०० प्रती खासदार, आमदार, शिक्षणतज्ज्ञ, संस्था, विचारवंत, पत्रकार, राजकीय नेते, कायदेतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि राज्यघटना व सरकारशी संबंधीत अनुभवी व्यक्तींना सोपविण्यात आल्या. आयोगाने केंद्र व राज्यांचा दौरा केला आणि महत्त्वाच्या व्यक्तींशी प्रत्यक्ष विचार विमर्श करून आपले निष्कर्ष एका अहवालाच्या रूपात तयार केले. सरकारिया आयोगाने आपला १६०० पानांचा अहवाल २ नोव्हेंबर १९८७ रोजी भारत सरकारला सादर केला.

सरकारिया आयोगाने केंद्र-राज्य संबंधाच्या प्रत्येक पहेलूचे बारकाईने अभ्यास करून आपल्या शिफारशी केंद्र सरकारला सादर केल्या. त्यातील काही शिफारशींचा केंद्र सरकारने स्वीकार केला असून अन्य शिफारशी स्वीकारण्याबाबत विचारविमर्श चालू आहे.

**केंद्र - राज्य संबंधाबाबतच्या शिफारशी :-**

१. कलम २४८ च्या अंतर्गत अवशिष्ट विषयावर कायदा करण्याचा अधिकार केंद्राकडेच असला पाहिजे.

२. केंद्र, राज्य आणि समवर्ती सूचीत परिवर्तन करू नये.

३. कलम २४९ काढून टाकू नये, कारण याचा वापर केंद्र सरकारने फार कमी वेळा केला आहे.

४. कलम २५६ आणि २५७ आवश्यक तरतूद आहे. ती तशीच असू द्यावी.

५. एखाद्या घटक राज्यात सशस्त्र दल पाठविण्यापूर्वी आणि त्यास 'उपद्रवग्रस्त क्षेत्र' घोषित करण्यापूर्वी केंद्राने त्या राज्याचा सल्ला घ्यावा.

६. अखिल भारतीय सेवांची उपयुक्तता जेवढी संविधान निर्मितीच्या वेळी होती तेवढीच आजही आहे. या संदर्भात केंद्र राज्यांनी समन्वय स्थापन करावा.

७. अखिल भारतीय सेवातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, वढती आणि अन्य



सेवाविषयक नियमात सुधारणा झाली पाहिजे.

८. सरळ भरतीद्वारे दाखल झालेला अधिकारी असो वा बढतीद्वारे दाखल झालेला अधिकारी त्यास काही काळासाठी तरी केंद्रात काम करण्यासाठी पाठविले पाहिजे.

९. केंद्र सरकारद्वारे, राज्यातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या शिस्त व नियंत्रणाखाली बदली, बढती, पदस्थापन आणि निलंबन रोखले पाहिजे.

१०. अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या समस्यांवर विचार करण्यासाठी आणि अन्य वादग्रस्त मुद्दे सोडविण्यासाठी एक सल्लागार परिषद निर्माण करावी.

११. योजना आयोगाचा उपाध्यक्ष नामवंत विशेषज्ञ असावा. जो राज्य सरकारांना विश्वासात घेऊ शकेल. राज्यस्तरावर योजना मंडळ स्थापन झाले पाहिजे.

१२. वित्त आयोगांनी आपली कार्ये पूर्ण करण्यासाठी देशातील वेगवेगळया भागात विशेषज्ञ नियुक्त करावयास पाहिजेत.

१३. वित्त आयोगात राज्य सरकारचे प्रतिनिधी देखील असावेत.

१४. राष्ट्रीय विकास परिषदेस कलम २६३ मधील तरतुदीनुसार राष्ट्रपतीच्या आदेशाने राष्ट्रीय आर्थिक आणि विकास परिषद असे नाव द्यावे.

१५. विशेष कारणाव्यतिरिक्त केंद्रसरकारने उत्पन्न करावर अधिभार लागू करू नये.

१६. घटक राज्यांना कर्ज देण्याचे धोरण आणि पध्दतीवर पुनर्विचार झाला पाहिजे.

१७. करमुक्त नगरपरिषद बॉंड पध्दती संपूर्ण देशभरात लागू करावी.

१८. उद्योगांच्या मंजूरीसाठी अनावश्यक लागणारा विलंब दूर करण्यासाठी एक समिती स्थापन करावी.

१९. उद्योगांना परवाना देणारे कार्यालये सर्वघटक राज्यांच्या राजधानीत सुरू करावेत.

२०. कलम ३०७ नुसार केंद्रसरकारद्वारे राज्याराज्यातील आंतरराज्यीय सीमा वादासाठी विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती केली पाहिजे.

२१. केंद्र सरकारची कार्ये असोत वा राज्य सरकारची ती जर स्थानिक जनतेशी संबंधीत असतील तर स्थानिक भाषेतूनच केली पाहिजेत.



Scanned with OKEN Scanner

**मंत्रिमंडळ बरखास्त करणे संबंधी :-**

१. एखाद्या मंत्रिमंडळाच्या मागे बहुमत आहे किंवा नाही ते राज्यपालांनी विधानसभेत सिध्द करावयास लावले पाहिजे.

२. एखाद्या मंत्रिमंडळास विधानसभेत बहुमत असेल तर अशा मंत्रिमंडळास बरखास्त केले जाऊ नये. मुख्यमंत्र्यांनी बहुमत गमावले असतानाही राजीनामा देत नसेल तर राज्यपाल अशा मंत्रिमंळास बरखास्त करण्यास बांधील असेल.

३. विधानसभेचे अधिवेशन चालू असेल तर बहुमताचा निर्णय सभागृहातच घेतला पाहिजे.

४. जर सभागृहाचे अधिवेशन चालू नसेल आणि मंत्रिमंडळाने बहुमत गमावले असेल तर त्याचा निर्णय केवळ विधानसभेत केला पाहिजे.

५. बहुमत प्राप्त मंत्रिमंडळाद्वारे विधिमंडळाचे अधिवेशन बोलावणे, स्थगित करणे या भंग करणे असा घटनात्मक सल्ला राज्यपालास मानावा लागेल.

६. बहुमत गमावलेल्या किंवा गमावण्याची शक्यता असणाऱ्या मंत्रिमंडळाने राज्यपालास विधानसभा भंग करण्याचा सल्ला दिल्यास राज्यपालाने याचा निर्णय सभागृहात करावा.

७. जर एखादे मंत्रिमंडळ सभागृहात शक्ती परीक्षण करू शकत नसेल तर राज्यपालाने विधानसभा भंग करण्याचा विचार करून संबंधीत राजकीय पक्ष व निर्वाचन आयोग यांच्याशी विचार विनिमय करून निवडणूकीची व्यवस्था करावयास पाहिजे.

८. जर विधानसभा भंग करावयाची असेल आणि लवकर नव्याने निवडणूका घ्यावयाच्या असतील तर त्याच मंत्रिमंडळाला कामचलावू सरकारच्या स्वरूपात राहण्यास सांगावे.

९. कोणत्याही काम चलावू सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊ नयेत.

१०. जर एखादे पराजित मंत्रिमंडळ काम चलावू सरकारच्या रूपात काम करण्यास इच्छूक नसेल तर विधानसभा भंग न करता राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस केली पाहिजे.

**विधेयकांची मंजूरी :-**

१. कलम २०० नुसार राज्य विधिमंडळाकडून एखादे विधेयक पारित झाल्यानंतर राज्यपालाकडे संमतीसाठी पाठविले जाते. अशा विधेयकावर कार्यवाही



करीत असताना राज्यपालांनी मंत्रिमंडळाचा सल्ला लक्षात ठेवला पाहिजे. केवळ व्यक्तीगत स्वरूपाची नाराजी ठेवणे योग्य नाही.

२. ज्या विधेयकास विधिमंडळात सादर करण्यापूर्वी राज्यपालाची संमती घ्यावी लागते असेच विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेवले पाहिजेत.

३. राज्यविधीमंडळाने संमत केलेली विधेयके जेव्हा राष्ट्रपतीकडे संमतीसाठी पाठविली जातात तेव्हा राष्ट्रपतीनी अशी विधेयके चार महिन्यांच्या आत निकाली काढली पाहिजेत.

**राज्यपालाच्या नियुक्तीसंबंधी :-**

१. ज्या व्यक्तिची राज्यपाल म्हणून नियुक्ती करावयाची आहे ती व्यक्ती श्रेष्ठ, नामवंत असावी.

२. ती राज्याच्या बाहेरील (अन्य राज्यातली) असावी.

३. नियुक्तीपूर्वी काही काळ तरी त्या व्यक्तीने राजकारणात सक्रिय सहभाग घेतलेला नसावा.

४. अल्पसंख्यांक वर्गातील व्यक्तीस राज्यपालपदी नियुक्ती करताना योग्य त्या प्रमाणात संधी द्यावी.

५. कलम १५३ मध्ये संशोधन करून राज्यपालाच्या नियुक्तीपूर्वी संबंधीत घटक राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी विचार विनिमय करण्याची तरतूद करावी.

६. राज्यपालाची नेमणूक करण्यापूर्वी राष्ट्रपतीने म्हणजे पंतप्रधानाने उपराष्ट्रपती आणि लोकसभेचा सभापती यांच्याशी विचार विनिमय करावा. विचार विनिमय गुप्त आणि औपचारिक असावा. यास घटनात्मक जबाबदारी मानण्यात येऊ नये.

७. राज्यपालास कार्यकालाची हमी द्यावी. अत्यंत महत्त्वाची कारणे असल्याशिवाय राज्यपालास पदावरून दूर करू नये. त्याला काढून टाकण्यापूर्वी कारणे सांगून आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी द्यावी. राज्यपालाने राजीनामा दिल्यास किंवा पाच वर्षाचा कार्यकाल संपण्यापूर्वी त्याला बडतर्फ केल्यास कोणत्या कारणामुळे व कोणत्या परिस्थितीत राज्यपालाचा राजीनामा स्वीकारावा लागला किंवा त्याला काढून टाकावे लागले या संबंधीचे निवेदन केंद्र सरकारने संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर ठेवावे.

८. राज्यपालपदाचा त्याग केल्यानंतर ती व्यक्ती दुसऱ्यांदा राज्यपालपद,



Scanned with OKEN Scanner

उपराष्ट्रपतीपद किंवा राष्ट्रपतीपद भूषवू शकते. मात्र वरील पदाखेरीज केंद्रातील किंवा राज्यातील कोणत्याही पदावर तिची नियुक्ती करू नये.

९. राज्यपालाचा कार्यकाल संपल्यावर त्याला निवृत्तीनंतरचे लाभ द्यावेत.

**कलम-३५६ च्या तरतूदीसंबंधी**

१. ३५६ व्या कलमाचा वापर शक्यतो कमीत कमी वेळा अंतिम उपाय म्हणून केला पाहिजे.

२. राज्यस्तरावर कलम ३५६ चा आधार घेण्यापूर्वी अन्य प्रयत्न केले जावेत.

३. बाह्य आक्रमण या अंतर्गत अशांतता यामुळे एखाद्या राज्याचे कार्य ठप्प झाले असेल तर कलम ३५५ ला अनुसरून ती कार्य चालू ठेवणे केंद्रसरकारचे कर्तव्ये असेल.

४. राज्य शासन भंग झाल्यानंतरही सर्वपर्यायावर गंभीरपणे विचार आणि योग्य प्रयत्न केल्यानंतरच कलम ३५६ चा आधार घ्यावा.

५. राष्ट्रपती राजवटीची घोषणा संसदेसमोर सादर केली पाहिजे आणि संसदेत विचार केल्याशिवाय विधानसभा भंग करू नये.

६. राष्ट्रपती राजवटीची घोषणा विधानसभा भंग न करताही केली जाऊ शकते.

७. ज्या राज्यपालाच्या अहवालावरून कलम ३५६ नुसार घटक राज्यातील आणीबाणीची घोषणा करण्यात आली आहे. तो अहवाल प्रसार माध्यमाद्वारे जनतेपर्यंत पोहचविला पाहिजे.

८. राष्ट्रपती राजवटीची घोषणा राज्यपालाच्या अहवालावरूनच केली पाहिजे.

९. कलम १६३ मध्ये देण्यात आलेले राज्यपालाचे स्वविवेकाधीन अधिकार यथावत राहिले पाहिजेत.

## फ) द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग २००५

**(Second Administrative Reforms Commission 2005):-**

यूपीए सरकारने २००५ साली कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री विरप्पा मोईली यांचे अध्यक्षतेखाली दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग घटित केला. या आयोगात



व्ही. रामचंद्रन, डॉ. ए. पी. मुखर्जी, ए. एच. कालरो आणि जयप्रकाश नारायण यांची सदस्य. म्हणून तर विनीता रॉय यांची सदस्य, सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. या आयोगावर भारत सरकारचा ढाचा, सरकारची नितिमत्ता, कर्मचारी प्रशासनात सुधारणा, प्रभावी जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वयं शासन, पंचायतीराजचे सशक्तीकरण,नागरिक केंद्रीत प्रशासन, ई. प्रशासन आदी बाबींचे अध्ययन करण्यासाठी आणि त्यात सुधारणा घडवून आणण्याकरिता उपाय सूचविण्याची जबाबदारी केंद्र सरकारने सोपविली होती.

आयोगाने वरील मुद्यांच्या अनुषंगाने अभ्यास करून महत्त्वपूर्ण शिफारशीसह १२ फेब्रुवारी २००७ ला आपला अहवाल पंतप्रधानांना सादर केला. त्यातील काही मुख्य शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. अलिकडच्या काळात वाढलेला निवडणूक खर्च विचारात घेता राजकीय पक्षाच्या निवडणूक खर्चातील काही भार केंद्र सरकारने उचलला पाहिजे.

२. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखालील निवडसमितीकडून मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त यांच्या नेमणूका व्हावयास पाहिजेत. या निवड समितीमध्ये पंतप्रधानासह लोकसभेचा सभापती, राज्यसभेचा उपाध्यक्ष, कायदामंत्री आणि विरोधी पक्ष नेता यांचा समावेश असावा.

३. १९८५ साली करण्यात आलेला पक्षांतर बंदी कायदा अधिक कडक करावयास पाहिजे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपती व राज्यपाल यांना असावा. त्यांनी निवडणूक आयोगाच्या सल्ल्यानुसार निर्णय घ्यावा.

४. निर्वाचित सदस्यांची अपात्रता निश्चित करण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा.

५. खासदार व आमदार यांचा स्थानिक विकास कार्यक्रम निधी समाप्त करावा.

६. लाभाच्या पदासंदर्भात अस्तित्वात असलेल्या कायद्यात दुरूस्ती करण्यात यावी आणि सल्लादायी स्वरूपाच्या पदास लाभाच्या पदाच्या व्याख्येपासून दूर ठेवावे.

७. राष्ट्रीय लोकायुक्ताची स्थापना करण्यात यावी. त्यांच्या अधिकार क्षेत्रात केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि खासदार आदींचा समावेश असावा. परंतु पंतप्रधानपदास दूर ठेवावे.



Scanned with OKEN Scanner

८. राष्ट्रीय न्यायिक परिषदेची स्थापना करावी, उपराष्ट्रपतीच्या अध्यक्षतेखाली बनविण्यात येणाऱ्या या परिषदेत पंतप्रधान, लोकसभेचा सभापती, सरन्यायाधिश, कायदामंत्री आणि लोकसभेतील व राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते यांचा समावेश असावा. परिषदेच्या सल्ल्यानुसार सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधिशांना पदच्युत करावे.

९. सनदी सेवकास लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले असेल तर कायदेशीर कार्यवाहीसाठी कोणाचीही पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता असू नय.

१०. मंत्री आणि सनदी सेवक यांच्यासाठी एक नैतिक आचारसंहिता तयार करण्यात यावी.

१. मोठया घोटाळयाच्या विशेष चौकशीसाठी वेगळी कायदेशीर तरतूद असावी. या संदर्भात आर्थिक गुन्हे कार्यालय स्थापन करावे.

१२. आघाडी सरकारमधून फुटून बाहेर पडणाऱ्या राजकीय पक्षाच्या सदस्यांनी पून्हा जनादेश घेतला पाहिजे. यामुळे केंद्र आणि घटक राज्यातील आघाडी सरकारांना अधिक स्थायित्व मिळू शकेल.

१३. राज्य शासनात स्थानिक स्वशासन संस्थांचे प्रतिनिधीत्व निश्चित करण्यासाठी प्रत्येक घटक राज्यात विधान परिषदेची स्थापना करावी.

१४. जिल्हाधिकारी हा राज्यसरकार व जिल्हा प्रशासन यांच्यातील एक दुवा असावा.

१५. महापौरांची निवड प्रत्यक्ष जनतेकडून केली जावी.

१६. दहा लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरासाठी एकीकृत परिवहन प्राधिकरणाची स्थापना करावी.

१७. तीव्र शहरीकरणामुळे उत्पन्न होणाऱ्या समस्यांचा निपटारा करण्यासाठी शहरीकरणावर राष्ट्रीय आयोग स्थापन करावा.

१८. निर्वाचन क्षेत्राचे परिसीमन व आरक्षण तरतुदीची जबाबदारी राज्य निर्वाचन आयोगावर सोपवावी.

१९. स्थानिक स्वशासन संस्थांना अधिक सशक्त व उत्तरदायी बनविण्यासाठी मार्गदर्शन करण्याकरीता केंद्रीय कायदा असावा.

२०. स्थानिक स्वशासन संस्थांना अधिक नागरिक केंद्रीत बनवावे.

२१. जिल्हास्तरावर लोकतांत्रिक सरकारचा एक तिसरा स्तर निर्माण करावा.



Scanned with OKEN Scanner